24 MAR 2017

सकाळ

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अध्यापनाच्या नव्या मांडणीची गरज

## डॉ. नागनाथ कोत्तापल्ले : शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : सध्या ज्ञानाचा गतिमान पद्धतीने विकास होत आहे. या परिस्थितीत केवळ मराठीच नव्हे, तर सर्वच विषयांच्या अध्यापनासंदर्भात नव्याने विचार व मांडणी करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त महाविद्यालयीन स्तरावरील मराठीचे अध्यापन या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्राच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. भाषाभवनमध्ये चर्चासत्र झाले.

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, ''सद्यःस्थितीत ज्ञानविस्तार हा प्रचंड गतीने आणि अनेक दिशांनी होत आहे. सर्व ज्ञानशाखा परस्परांशी सम्मिलित होऊन त्यातून पुन्हा नवीन ज्ञानशाखा उदयास येत आहेत.



डॉ.नागनाथ कोत्तापल्ले.

पारंपरिक अभ्यासक्रम व अध्यापन प्रक्रियेमध्ये शिक्षकांनी अडकून राहता कामा नये. नव्या ज्ञानाचा, त्याच्या विस्ताराचा आवाका लक्षात घेऊन स्पेशलायझेशनबरोबरच अन्य विद्याशाखांमधील ज्ञानाचा आधार घेऊन आपल्या विषयाशी त्याची सांगड कशा पद्धतीने घालता येईल, याचा अभ्यास शिक्षकांनी करावा.''

ते म्हणाले, ''मराठी ही ज्ञानभाषा व्हावी, ज्ञानव्यवहाराची भाषा व्हावी, असे जोपर्यंत प्रत्येकाला वाटत नाही, तोपर्यंत तिचा विकास होणे अशक्य आहे.'' डॉ. ठाकूर म्हणाले, ''मराठीसह अन्य भाषा विषयांबाबत वाढते औदासिन्य चिंताजनक आहे. काळाच्या मागण्या सातत्याने बदलताहेत, त्या मागण्यांची पूर्तता करण्याचे आणि त्यांना सामोरे जाणारी पिढी घडविण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या जीवनव्यवहारात आपण मराठीचा संपूर्ण वापर करणार आहोत की नाही, हा कळीचा प्रश्न आहे.''

डॉ. शिंदे म्हणाले, ''आई इतकाच सन्मान मातृभाषेलाही देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळात अन्य संस्थानिक, राजे अरबी, उर्दू, फारसी भाषांच्या प्रभावाखाली असताना आपला पत्रव्यवहार मराठीतून करण्यास प्राधान्य दिले. हे मराठी भाषेला महाराजांचे फार मोठे योगदान आहे. हा आदर्श समोर ठेवून आपण मराठीतून व्यवहारास प्राधान्य द्यायला हवे.''

या वेळी डॉ. कोत्तापल्ले यांच्या हस्ते डॉ. रवींद्र ठाकूर यांचा निवृत्तीनिमित्त सपत्नीक सत्कार झाला. अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले, तर शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष शिवकुमार सोनाळकर यांनी आभार मानले. या वेळी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते.

2 4 MAR 2017 Times of India

# SUK semester exams begin today

Rahul Gaikwad



Over 500 exams will be conducted in 42 working days

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The summer semester examination at Shivaji University, Kolhapur (SUK) is set to begin across Sangli, Satara and Kolhapur districts on Friday, an official from the exam department said.

Over 500 exams will be conducted in 42 working days, he said. "The department will continue with shorter version of exam schedule and internal mark-feeding software, and online evaluation to draw simultaneous course-wise results."

According to the official, the exams will begin with minor subjects with lower student capacity. As the schedule progresses, the full-fledged examination will commence. The under-graduate examinations will begin first, followed by post-graduate examinations.

Elaborating on the schedule, the official said the exams for repeater s will begin in the first phase, while the regular exams of BA, B.Com and B.Sc courses will begin later next week.

**For the exams, over 200 centres have been fixed across Sangli, Satara and Kolhapur districts. The SUK has a total of 282 affiliated colleges with more than 3 lakh students studying over 30 courses**

The engineering exams will start in April with repeaters' exams. The department will be attempting to declare the engineering results by June 10, the official added.

Over 200 exam centres have been fixed across the Sangli, Satara and Kolhapur districts in the division. The SUK has 282 affiliated colleges across the three districts, with more than three lakh students studying over 30 courses.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAR 2017

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आयोजित महाराष्ट्र जलदूत संमेलनाला प्रतिसाद

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात विश्‍व जल दिवसाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र जलदूत संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हे संमेलन शिवाजी विद्यापीठाचे तंत्रज्ञान अधिविभाग, भारतीय जलसंस्कृती मंडळ आणि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. भारतीय जलसंस्कृती मुख्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. दत्ता देशकर प्रमुख पाहुणे होते. अध्यक्षस्थानी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी होते. डॉ. देशकर यांनी यावेळी विश्‍व जल दिवसाची सुरुवात कशी झाली? ती का करावी लागली? मागील १०० वर्षांतील पर्जन्यमान आणि त्यातील बदल याविषयी मूलभूत माहिती दिली. यामध्ये भारतीय जलसंस्कृती मंडळाचे शशांक देशपांडे यांनी 'महाराष्ट्रातील भूजल वापर व कायद्याची गरज' याविषयी सविस्तर मांडणी केली. दुपारच्या सत्रात विनोद बोधनकर, प्रा. डॉ. अनिलराज जगदाळे, यांनी सविस्तर माहिती दिली. प्रास्ताविक प्रा. महेश साळुंखे यांनी सूत्रसंचालन कु. रविना पुजारी यांनी केले.

24 MAR 2017

पुढारी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अध्यापनासंदर्भात नव्याने विचार करण्याची गरज

## डॉ. नागनाथ कोत्तापल्ले; डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आता ज्ञान गतीने विकसित होत आहे. या परिस्थितीत केवळ मराठीच नव्हे, तर सर्वच विषयांच्या अध्यापनासंदर्भात नव्याने विचार व मांडणी करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि मराठी शिक्षक संघातर्फे आयोजित डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त 'महाविद्यालयीन स्तरावरील मराठीचे अध्यापन' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.यावेळी डॉ. रवींद्र ठाकूर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करण्यात आला.



**कोल्हापूर : डॉ. रवींद्र ठाकूर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक सत्कार करताना डॉ. नागनाथ कोत्तापल्ले. शेजारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, 'मराठी ही ज्ञानभाषा व्हावी, ज्ञानव्यवहाराची भाषा व्हावी, असे जोपर्यंत प्रत्येकाला वाटत नाही, तोपर्यंत तिचा विकास होणे अशक्य आहे. ही भाषा माझी आहे, असे लोकांना का वाटत नाही, याविषयीचे चिंतनही करणे आवश्यक आहे. भाषेला अस्मिता, अहंगंडाची पुटे चढविणे चुकीचे आहे.'

मराठी विभागाने केलेल्या या सत्कार समारंभामुळे आपण भावनावश झाल्याचे सांगून डॉ. ठाकूर म्हणाले, 'मराठीसह अन्य भाषा विषयांबाबत वाढते औदासीन्य चिंताजनक आहे. काळाच्या मागण्या सातत्याने बदलताहेत. या मागण्यांची पूर्तता करण्याचे आणि त्यांना सामोरे जाणारी पिढी घडविण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या जीवनव्यवहारात आपण मराठीचा संपूर्ण वापर करणार आहोत की नाही, हा कळीचा प्रश्न आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, आईइतकाच सन्मान मातृभाषेलाही देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळात अन्य संस्थानिक, राजे अरबी, उर्दू, फारसी भाषांच्या प्रभावाखाली असताना आपला पत्रव्यवहार मराठीतून करण्यास प्राधान्य दिले. हे मराठी भाषेला महाराजांचे फार मोठे योगदान आहे. हा आदर्श समोर ठेवून आपण मराठीतून व्यवहारांस प्राधान्य द्यायला हवे.' त्याचप्रमाणे मराठीच्या अध्यापनाविषयी चर्चा करीत असताना वाङ्मयीन समीक्षेबद्दलही सांगोपांग विचार करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष शिवकुमार सोनाळकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे यांच्यासह मराठीचे महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

24 MAR 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्वच विषयांच्या अध्यापनासंदर्भात नव्याने विचार करा

## – नागनाथ कोत्तापल्ले

कोल्हापूर / प्रतिनिधी :

सध्या ज्ञानाचा गतिमान पद्धतीने विकास होतो आहे. या परिस्थितीत केवळ मराठीच नव्हे, तर सर्वच विषयांच्या अध्यापनासंदर्भात नव्याने विचार व मांडणी करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी गुरुवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त 'महाविद्यालयीन स्तरावरील मराठीचे अध्यापन' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कोत्तापल्ले बोलत होते. वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.



कोल्हापूर : डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त 'महाविद्यालयीन स्तरावरील मराठीचे अध्यापन' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. नागनाथ कोत्तापल्ले. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, पारंपरिक अभ्यासक्रम आणि अध्यापन प्रक्रियेमध्ये शिक्षकांनी अडकून राहता कामा नये.

डॉ. ठाकूर म्हणाले, मराठीसह अन्य भाषा विषयांबाबत वाढते औदासीन्य चिंताजनक आहे. काळाच्या मागण्या सातत्याने बदलताहेत. त्या मागण्यांची पूर्तता करण्याचे आणि त्यांना सामोरे जाणारी पिढी घडविण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, आईइतकाच सन्मान मातृभाषेलाही देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळात अन्य संस्थानिक, राजे अरबी, उर्दू, फारसी भाषांच्या प्रभावाखाली असताना आपला पत्रव्यवहार मराठीतून करण्यास प्राधान्य दिले. हे मराठी भाषेला महाराजांचे फार मोठे योगदान आहे. हा आदर्श समोर ठेवून आपण मराठीतून व्यवहारास प्राधान्य द्यायला हवे.

यावेळी डॉ. कोत्तापल्ले यांच्या हस्ते डॉ. रवींद्र ठाकूर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक सत्कार करण्यात आला. अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शिवकुमार सोनाळकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.